# कृषिसमृध्दी : समन्वयीत कृषि विकास प्रकल्प

# यशोगाथा

# दुग्धव्यवसायातुन विकास



अमरावती जिल्हयातील चांदुररेल्वे तालुक्यातील टेंभुणी हे गाव तालुक्याच्या ठिकाणापासुन ५ कि.मी. अंतरावर आहे. गावात २०८ कुटुंबे असुन गावात दुधाळ जनावरांची संख्या कमी असल्यामुळे तेवढेच दुध गावासाठी निघत होते बाहेर गावासाठी दुधविक्रीचे प्रमाण अत्यल्प होते. गावाच्या लोकांना योजना, योजनेतुन मिळणारे फायदे, पुरक व्यवसाय म्हणुन व्यवसायाकडे बघण्याचा दृष्टीकोन देण्याची गरज दिसत होती. परंतु तशा मार्गदर्शनाचा अभाव जाणवत होता.

कृषिसमृध्दी : समन्वयीत कृषिविकास प्रकल्प गावात जुन २०११ मध्ये सुरु झाला. गावाची निकड लक्षात घेता ६ लाभार्थ्यांचा मिळुन महालक्ष्मी संयुक्त दायित्व गट तयार करण्यात आला. सर्व ५ जणांचा गायी घेण्याकरीता कर्ज मिळणेबाबतचा प्रस्ताव बँकेत सादर करण्यात आला परंतु त्यामधील एक व्यक्ती त्या बॅकेची कर्जदार होती व त्यांनी ते कर्ज वेळेत फेडले नसल्याकारणाने सदर अर्जदार हा भुमिहीन असल्याने त्यांना पुन्हा कर्ज देण्यास बँकेने नकार दिला. अशा परिस्थितीत प्रकल्पाच्या मार्गदर्शनातुन अफार्म संस्थेच्या प्रयत्नाने या एक व्यक्तीचे कर्ज संयुक्त दायित्व गटातील उर्वरीत व्यक्तींनी रक्कम जमा करुन फेडले व त्यामुळे सदर अर्जदार कर्ज मुक्त झाल्याने सदर गट कर्ज मिळणेस पात्र झाला व या संयुक्त दायित्व गटास बँकेकडुन कर्ज प्राप्त झाले. महालक्ष्मी संयुक्त दायित्व गट आणि तुळजाई संयुक्त दायित्व गट या गटांचे एकुण १३ सदस्यांना घेऊन सुरु केलेल्या या गटांना प्रकल्पातुन भुमिका व जबाबदारी तसेच पशुधन विकास अधिकारी यांचे मार्गदर्शनात दुग्ध व्यवसाय विकास व व्यवस्थापन ही प्रशिक्षणे देण्यात आली. तालुका कृषि अधिकारी कार्यालयाचे माध्यमातुन राष्ट्रीय वैरण विकास कार्यक्रमांतर्गत लाभार्थींना चारा बियाणे वाटप करुन त्यांची लागवड केली. क्षमता वर्धनाचे काळात पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप या अंतर्गत निलय डेअरी, कार्ला तसेच सेंट्रल बँक ऑफ इंडिया, चांदुर रेल्वे शाखा आणि संयुक्त दायित्व गट यांचेमध्ये त्रिपक्षीय करार करुन सदर लाभार्थींना प्रत्येकी रु. ८०,०००/- दोन जनावरांसाठी कर्ज मंजुर करण्यात आले. त्यापैकी २५ टक्के रक्कम लोकसहभागाद्वारे भरला व ७५ टक्के रक्कम बँकेने कर्ज स्वरुपात दिले. सदर लाभार्थीनी त्यांचे मर्जी नुसार चांदुरबाजार येथील बाजारातुन जर्शी गायी व म्हशी विकत घेतल्या. कृषिसमृध्दी प्रकल्पातुन जनावरांचा विमा उतरविण्यात आला.

**प्रकल्पातुन फायदा :**



प्रकल्पाचे माध्यमातुन गावात १३ गायी/म्हशी आल्यात. सुरुवातीला साधारणत: प्रत्येकी आठ लिटर याप्रमाणे १०४ लिटर दुधाचे उत्पादन सुरु झाले. सदर दुध सुरुवातीला चांदुररेल्वे येथील निलय डेअरीच्या दुध संकलन केंद्रामध्ये देण्यात येत होते. रु. १८ प्रति लिटर प्रमाणे रु. १८७२ दररोज दुध विक्रीतुन मिळायला लागले.

त्यामुळे लाभार्थीचा उत्साह व विश्वास वाढीस लागला. पुढे ८ महिन्यानंतर प्रत्येक सदस्यांनी दुसरी गाय लोकसहभाग व बँक कर्ज घेऊन घेतली. याप्रमाणे आता गावात ४ म्हशी व २२ गायी आहेत. अनुभवातुन लक्षात आले की, जर्सी गाय ९ ते १० महिण्यापर्यंत दुध देते. त्यामुळे गायी जास्त घेतल्या गेल्या. सध्या गावात २६ जनावरांचे मिळुन १७० लिटर दुध उत्पादन सुरु असुन सदर दुध आमला येथील यशोधरा डेअरीच्या दुध कलेक्शन सेंटर वर देण्यात येत असुन त्या माध्यमातुन रु. ३०६०/- दररोजचे दुध विक्रीतुन पैसे मिळत आहे. सुरुवातीला बँक परतफेड प्रत्येकी रु. ६४०/- मासिक भरल्या जायची तर आता दोन जनावरांची मिळून प्रत्येकी रु. १२८०/- भरण्यात येत आहे. याच सोबत तयार होणारे शेणखत, कालवड, हेले हा वेगळाच फायदा असुन शेतीला पुरक व्यवसाय म्हणुन या व्यवसायाकडे बघण्याच्या दृष्टीकोणात वाढ झाली असुन कायम स्वरुपाची व्यवसाय चालण्याची लोकांची मानसिकता दिसते हा या प्रकल्पातील मार्गदर्शनाचा मोठा फायदा झाला.

**यशस्वी लाभार्थ्याचे मनोगत :**

मी, साहेबराव नामदेवराव सुरपान, वय ४० वर्षे, व्यवसाय शेती, रा. टेंभुर्णी ता. चांदुररेल्वे जि. अमरावती. माझी ४ एकर शेती असुन १ विहीरीचे माध्यमातुन हंगामी ओलीत आहे. कृषिसमृध्दी प्रकल्प सुरु होण्यापुर्वी माझे जवळ १ गाय व १ बैल होता. त्यामुळे गाय पालनाचा बऱ्यापैकी अनुभव गाठीशी होता.

कृषिसमृध्दी प्रकल्पांतर्गत स्थापना करण्यात आलेल्या महालक्ष्मी संयुक्त दायित्व गटाचा मी सदस्य आहे. प्रकल्पातुन मिळालेल्या विविध प्रशिक्षणाचा फायदा गायी पालनासाठी झाला. प्रकल्पातुन माझी २ गायी घेण्याबाबतची कर्ज मंजुरीची फाईल मंजुरी झालेली आहे. सुरुवातीला मी रु. १००००/- लोकसहभाग भरला व बँकेतुन रु. ३००००/- चे आर्थीक सहाय्य यातुन १ जर्सी गाभण गाय विकत घेतली. सोबतच रु. १००००/- लोकसहभाग भरुन बँकेतुन दुसऱ्या गायीच्या निधीतुन १ गाय विकत घेतली. आता माझे जवळ तीन गायी झाल्या. व्यवसायात चांगला फायदा दिसत असल्या कारणाने मी शेतीतुन निघालेले सोयाबीन विकुन पुन्हा दोन गायी विकत घेतल्या. आज माझेजवळ सध्या ५ गायी, ६ कालवडी व २ बैल अशी जनावर संख्या आहे. मी नियमित बँकेचा हप्ता परतावा रु. १२८०/- दर महिन्यात जमा करतो.

प्रकल्पातुन कृषि विभागाचे सहाय्याने मिळालेले चार पिक शेतात लावले त्यामुळे घरचा हिरवा चारा मिळाला. शेतीसाठी शेणखत मोठया प्रमाणात तयार होत आहे, शेणखत विकत घेण्याचा पैसा वाचला. सध्या माझे घरुन २० लिटर दुध दररोज डेअरीवर विक्रीला जात आहे, कारण आधीच्या गायीचे दुध देण्याचे प्रमाण हळुहळु कमी झाले. जर्सी गाय ९ ते १० महिने दुध देतात. या व्यतिरीक्त ताक, दहि व लोणी तयार करुन महिन्याचे रु. ३०००/- ते रु. ४०००/- मिळतात. गायीच्या दुधातुन मिळणाऱ्या रकमेतुन मी रु. २०,०००/- ते रु. २५,०००/- सावकारी कर्ज फेडले. मुलांचा शिक्षणाचा खर्च होत आहे, टी.व्ही. घेतला, शेतात चना, मका, पेरला हे सगळे कृषिसमृध्दी प्रकल्पामार्फत मिळालेल्या मार्गदर्शनाद्वारे गायी पालन व्यवसायातुन साध्य झाले हे मला आवर्जुन सांगावे वाटते. घरी मुलांना दुध, दही, तुप खायला मिळायला लागले, त्यामुळे त्यांच्या आजारापणावर होणारा खर्च कमी झाला.

मी प्रकल्पाला धन्यवाद सहीत, शुभेच्छा देतो.

---

**संपर्क :**

**कृषिसमृध्दी : समन्वयीत कृषि विकास प्रकल्प,**

**प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, सहकार संकुल, पहिला मजला, कांता नगर, अमरावती.**

**फोन नंबर - ०७२१-२५५२४७५**

***